कारणे

गुण क्र. १ :- उभय पक्षांच्या तक्रार व खुलासा दाखल कलेले पत्र व सर्कुलर, विद्यूत कायदा २००३ मधील भाग १२ व १४, कलम १२६ मुल्याकंन, कलम १२७ (१ ते ६) Appeal to Appellate Authority, महाराष्ट्र विद्यूत नियामक आयोग (विद्यूत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विधीनियम २००५ मधील कलम १५.४.१ व Circular No. 224 Maharashtra Electricity Regulatory Commission (Standards of Performance of Distribution Licensees, Period for giving Supply and Determination of Compensation) Regulations, 2014 Implementation thereof. मधील १० मधील च्या तरतुदी लक्षात घेऊन मान्य बाबींचा उल्लेख खालील प्रमाणे आहे.

१) गैरअर्जदार यांनी अर्जदाराच्या सप्टेंबर २०१७ च्या बिला पोटी जम्प झालेले ५७७ युनीटचे बिल मागील सहा महिन्यामध्ये विभागणी करुन दिले आहे. कारण सहा.अभियंता शाखा क्र.८ लातूर यांच्या दि. ०९.१०.२०१७ च्या स्थळ तपासणी अहवालावरील जोडभार (1117 Watt) व लॉन्ड्रीचा व्यवसाय पाहता ते योग्य व बरोबरआहे.

२) गैरअर्जदार यांनी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या दि. ०४.०१.२०१८ च्या आदेशानुसार अर्जदाराचा मिटर हा महावितरण कडील योग्यत्या चाचणी विभागाकडून दि.१४.०३.२०१८ तपासणी करण्यात आला असुन तो सुस्थितीत आहे असे दर्शविले आहे त्यामुळे तो ग्राह्य धरणे अवश्यक आहे. ग्राहकाचा मीटर हा Rolex कंपनीचा असुन तो बदलने आवश्यक आहे.

३) अर्जदार ग्राहकाचे सप्टेंबर २०१७ चे ५७७ युनीटचे बिल हे समान विभाणी करुन प्रचलीत संगणक प्रणाली नुसार दुरुस्त केले असुन रु. १५५६.३६/- इतके बिल कमी करुन दिले असुन ते योग्य व बरोबर आहे.